आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१४ फेब्रुवारी २०२६ - वार

**ठळक बातम्या**

- कसारा-मनमाड दरम्यान रेल्वेची तिसरी आणि चौथी मार्गिका, पालघर - घोटी दरम्यान महामार्गाच्या चौपदरीकरणाला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी

- नैसर्गिक शेतीचा अवलंब करण्याचं बीडमध्ये महा पशुधन एक्स्पोच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- जिल्हा परिषद निवडणुकीदरम्यान अल्पवयीन मुलाला मतदान केंद्रात प्रवेश दिल्याप्रकरणी सोलापुरात दोघे निलंबित

**आणि**

- मुंबईत निर्माणाधीन मेट्रोच्या खांबाचा काही भाग कोसळल्यानं एकाचा मृत्यू, तिघे जखमी

**<><><><><>**

केंद्र सरकारनं कसारा ते मनमाड दरम्यान रेल्वेची तिसरी आणि चौथी मार्गिका तसंच घोटी ते पालघर दरम्यान राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचा निर्णय घेतला आहे. माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळ बैठकीतल्या निर्णयांची माहिती आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत दिली.

**होल्ड अश्विनी वैष्णव**

राष्ट्रीय महामार्ग १६० ए च्या घोटी-त्र्यंबक-पालघर या टप्प्याचं चौपदरीकरण करण्याचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. यामुळं दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्ग, समृद्धी महामार्गाशी हा भाग जोडला जाणार आहे. १५४ किलोमीटर लांबीच्या या मार्गासाठी ३ हजार ३२० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

१ लाख कोटी रुपयांचा अर्बन चॅलेंज फंड उभारण्याचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. १० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांना याचा लाभ होईल. यातून शहरांचा पुनर्विकास, शहरांचं वृद्धी केंद्रात रुपांतर तसंच पाणी आणि स्वच्छता या समस्यांवर काम केलं जाईल. याशिवाय १० हजार कोटी रुपयांचा स्टार्टअप इंडिया फंड ऑफ फंडही केंद्र सरकार सुरू करणार आहे.

केंद्रीय मंत्रीमंडळाची साऊथ ब्लॉक मध्ये झालेली ही शेवटची बैठक होती. या पुढच्या बैठका सेवा तीर्थमध्ये होणार आहे. नॉर्थ ब्लॉक आणि साऊथ ब्लॉकच रुपांतर युगे युगीन भारत या संग्रहालयात होणार असल्याची माहिती वैष्णव यांनी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आसाममधल्या दिब्रुगढमध्ये मोरान बायपास इथल्या आपत्कालीन परिस्थितीत विमानं उतरवण्याच्या धावपट्टींचं उद्घाटन केलं. आपल्या आजच्या आसाम भेटीसाठी ते आज सकाळी याच धावपट्टीवर उतरले. भारतीय हवाई दलाच्या सहकार्यानं दिब्रुगढमधल्या एका राष्ट्रीय महामार्गालगत या धावपट्ट्या उभारल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत लष्करी आणि नागरी विमानं उतरवणं आणि त्यांचं उड्डाण करण्यासाठी या धावपट्ट्या विकसित केल्या आहेत. या धावपट्ट्यांच्या उद्घाटनानंतर प्रधानमंत्र्यांनी लढाऊ विमानं, वाहतूक विमानं आणि हेलिकॉप्टर्सच्या हवाई प्रात्यक्षिकांचीही पाहणी केली.

पीएम-ई बस सेवा योजनेअंतर्गत देशातल्या चार शहरांसाठीच्या २२५ इलेक्ट्रिक बस ते हिरवा झेंडा दाखवून त्यांनी रवाना केलं. त्यात नागपूर आणि भावनगरसाठीच्या प्रत्येकी ५०, गुवाहाटीसाठी १०० आणि चंदीगडसाठीच्या २५ बसचा समावेश आहे.

**<><><><><>**

रासायनिक खतांमुळे कमी होत असलेल्या उत्पादकतेच्या पार्श्वभूमीवर सर्व शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीचा वापर करावा, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते आज परळी इथं  आयोजित  महा पशुधन एक्स्पो २०२६ प्रदर्शनात पशुपालकांशी संवाद साधताना बोलत होते. उत्तम रोजगार निर्मिती करण्यासाठी शेतीला जोड़ व्यवसाय आवश्यक असून राज्यातल्या शेती विकास आणि उत्पादकता वाढवण्यासाठी ५०० कोटी रुपयांचं मिशन राबवण्यात येत असल्याचंही त्यांनी सांगितलं. शेती पुन्हा फायदेशीर करण्यासाठी आणि पशुधन सुरक्षित करण्यासाठी वैरण विकास उपक्रम हाती घेतला जाणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

आर्थिक प्रगती, उद्योग-रोजगार वाढ आणि सर्वसमावेशक विकास या तत्त्वांवर आधारित यंदाचा अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचं केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयुष गोयल यांनी शनिवारी स्पष्ट केलं. मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. २०२६ चा हा अर्थसंकल्प ‘अमृतकाळातील विकसित भारत २०४७ च्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल असणार आहे. या अर्थसंकल्पातून राज्याला मोठा लाभ मिळाला आहे. राज्यातल्या रेल्वे आणि पायाभूत क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक निश्चित करण्यात आली असून राज्यासाठी सुमारे २४ हजार कोटी रुपयांची रेल्वे तरतूद करण्यात आली आहे, असं त्यांनी सांगितलं. मुंबईतल्या IICT च्या माध्यमातून अनेक ठिकाणी छोटी केंद्र सुरू करणं, पुणे आणि नागपूरला ग्रोथ हब म्हणून विकसित करण्याची योजना आणि विविध परिवहन प्रकल्पांचा राज्याला फायदा होणार आहे, असं गोयल म्हणाले.

**<><><><><>**

सोलापूरमध्ये नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीदरम्यान एका अल्पवयीन मुलाला मतदान केंद्रात प्रवेश दिल्या प्रकरणी मतदान अधिकारी आणि पोलीस शिपायाला निलंबित करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगानं दिले आहेत. राष्ट्रवादी शरद्चंद्र पवार पक्षाचे उमेदवार अर्जुन सिंह मोहिते पाटील हे आपल्या १४ वर्षांच्या मुलाला घेऊन मतदान यंत्राजवळ गेले होते. या प्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

<><><><><>

मुंबईत मुलुंड इथं एल बी एस मार्गावर मेट्रो रेल्वेमार्गाच्या बांधकाम सुरु असलेल्या खांबाचा काही भाग आज दुपारी कोसळून एकाचा मृत्यू झाला तर तीन जण जखमी झाले आहेत. एल बी एस मार्गावर जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीजवळ दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमाराला ही घटना घडली. बांधकाम सुरु असलेल्या खांबाचा सिमेंटचा भाग खाली असलेल्या ऑटो रिक्षावर कोसळून हा अपघात झाल्याचं अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं .

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले असून या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. मृताच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकार देईल आणि जखमींच्या उपचाराचा खर्च राज्य सरकार करेल, असं ते म्हणाले.

<><><><><>

नाशिकमधल्या बाल येशू यात्रेला आजपासून उत्साहात सुरुवात झाली. ही यात्रा आज आणि उद्या अशी दोन दिवस चालणार आहे. नाशिक पुणे महा मार्गावरच्या या बाल येशू यात्रेनिमित्त काल सायंकाळी प्रार्थना घेण्यात आली तसेच आजही दर तासाला मिस्सा अर्थात येशूची प्रार्थना करण्यात येणार आहे.

<><><><><>

रत्नागिरीकर म्हणून आपण १४० किलोमीटर समुद्रकिनाऱ्याच्या संरक्षणाची जबाबदारी घेऊ या असं आवाहन रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी केलं आहे. ते आज रत्नागिरीत पोलीस संचलन मैदानावर 'सीआयएसएफ' अधिकाऱ्यांच्या वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉनचं स्वागत केल्यावर त्यांना पुढच्या मार्गक्रमणासाठी शुभेच्छा देताना बोलत होते. समुद्रकिनारा सुरक्षित ठेवण्यासाठी काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत ही सायक्लोथॉन आयोजित करण्यात आली आहे.

**<><><><><>**

परभणी जिल्हयात “सिल्क अॅण्ड मिल्क” ही अभिनव संकल्पना राबवली जात आहे. याचाच भाग म्हणून ११ मार्च पर्यंत महारेशीम अभियान राबविण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी आज रेशीम चित्ररथाला हिरवा झेंडा दाखवून अभियानाचा शुभारंभ केला. या अभियानाद्वारे शेतकऱ्यांना रेशीम शेतीचे महत्त्व, शासकीय योजना तसंच अनुदानाची माहिती देण्यात येणार आहे.

**<><><><><>**

सुप्रसिद्ध चित्रपट आणि मालिका दिग्दर्शक आनंद रामानंद सागर यांचं काल मुंबईत दीर्घ आजारानं निधन झालं. त्याची पत्नी निशा सागर यांनी ही माहिती दिली. ते गेल्या पंचवीस वर्षांपासून पार्किन्सन्सनं आजारी होते. त्या स्थितीतही त्यांनी एका खाजगी वाहिनीसाठी रामायण या नव्या मालिकेचं दिग्दर्शन केलं होते. हमराही, प्यारा दुश्मन, राम भरोसे, अमन या सारख्या अनेक चित्रपटांचं आणि रामायण आणि शिर्डी के साईबाबा सारख्या मालिकेचं दिग्दर्शनही केलं होतं. दूरदर्शनवर गाजलेल्या रामायण मालिकेचे निर्माता दिग्दर्शक रामानंद सागर यांचे ते ज्येष्ठ पुत्र होते.

**<><><><><>**

नवी दिल्लीच्या अखिल भारतीय विश्वविद्यालय संघाच्या वतीनं म्हैसूर इथं आयोजित ३९ व्या दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सव-२०२६ मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने एकूण १३ पारितोषिके पटकावली. त्यामध्ये ११ वैयक्तिक आणि सांघिक स्पर्धांतील बक्षिसांसह दोन विभागांतील सर्वसाधारण विजेतेपदं मिळवली आहेत. ९ ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ही स्पर्धा झाली. कर्नाटक, महाराष्ट्र आणि गोवा या तीन राज्यांतल्या एकूण ३६ विद्यापीठांचा सहभाग असलेल्या या महोत्सवात विविध कला प्रकारांत स्पर्धा झाल्या **.**

**<><><><><>**

नंदूरबार जिल्ह्यातल्या तोरणमाळ इथं येत्या 20 ते 22 फेब्रुवारी दरम्यान ‘तोरणमाळ - रंग निसर्गाचे नंदूरबार 2026’ महोत्सवाचं आयोजन केलं आहे. या तीन दिवसीय महोत्सवात आदिवासी संस्कृतीचं दर्शन, पारंपरिक लोककला आणि विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम होणार आहेत.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज क गटात कोलकत्ता इथं इंग्लंड आणि स्कॉटलंड यांच्यात सामना सुरु आहे. या सामन्यात इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

कोलंबो इथं आज ब गटात आयर्लंड आणि ओमान यांच्यात झालेल्या सामन्यात आयर्लंडनं ओमानवर ९६ धावांनी विजय मिळवला.

स्पर्धेत आज संध्याकाळी अहमादाबाद इथं ड गटात न्यूझिलंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात सामना होणार आहे.स्पर्धेत काल ब गटात झालेल्या सामन्यात झिम्बावेनं दिग्गज ऑस्ट्रेलियावर २३ धावांनी मात करत धक्कादायक विजयाची नोंद केली. ड गटात झालेल्या सामन्यात संयुक्त अरब अमिरातीनं कॅनडाचा ५ गडी राखून पराभव केला. अ गटात झालेल्या सामन्यात अमेरिकेनं नेदरलँडवर ९३

धावांनी विजय मिळवला. यापुढचा सामना उद्या पाकिस्तानसोबत होणार आहे. हा सामना कोलंबो इथं खेळवला जाईल.

**//<><><><><>//**